**<u>ठळक बातम्या</u>**

- दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुतेचं धोरण असल्यानंच एनडीए सरकारच्या काळात जम्मू-काश्मीरमधे दहशतवादी घटनांमध्येही मोठी घट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं राज्यसभेत प्रतिपादन
- महाराष्ट्राचा आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर
- देवगड हापुस आंब्याच्या नावाखाली होणारी फसवणुक रोखण्यासाठी यंदापासून या आंब्यावर यूनिक आयडी कोड लावला जाणार

**आणि**

- स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरीत ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीचा आज उपांत्यपूर्व फेरीचा सामना

**<><><><><>**

राज्यसभेत आज गृह मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुतेचं धोरण बाळगणारं आहे, त्यामुळेच एनडीए सरकारच्या काळात जम्मू आणि काश्मीरमधे दहशतवादामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये ७० टक्क्यानं घट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या चर्चेच्या वेळी सांगितलं. या क्षेत्रातल्या दहशतवादी घटनांमध्येही मोठी घट झाल्याचं ते म्हणाले. यावेळी शहा यांनी देशाच्या सीमा आणि अंतर्गत सुरक्षा बळकट करण्यासाठी बलिदान देणाऱ्या राज्य पोलीस आणि केंद्रीय निमलष्करी दलाच्या जवानांचेही आभार मानले.

केंद्र सरकारनं ग्लोबल साऊथ आणि ग्लोबल नॉर्थ अंतर्गत येत असलेल्या ३० पेक्षा जास्त देशांसोबत धोरणात्मक भागीदारी प्रस्थापित तसंच बळकट केली असल्याचं परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पवित्रा मार्गरिटा यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तराच्या माध्यमातून सांगितलं.

<><><><><>

अमेरिकेनं ५ फेब्रुवारीला भारतात विमानातून परत पाठवलेल्या निर्वासितांना दिलेल्या अमानवी वागणुकीबद्दल, विशेषत: महिलांसाठी बेड्या वापरल्याच्या कृतीबद्दल भारतानं अमेरिकेच्या अधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदवल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली. या मुद्यावरून आपण सातत्यानं अमेरिकेच्या संपर्कात असल्याचं त्यांनी या उत्तरात म्हटलं आहे. १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी भारतात उतरलेल्या विमानांमधल्या कोणत्याही महिला किंवा मुलांशी गैरवर्तन झालं नसल्याचं अमेरिकीनं स्पष्ट केलं.

लोकसभेत आज जलशक्ती मंत्रालयाशी संबंधित २०२५ - २६ या वर्षाकरता अनुदान मागण्या मंजूर झाल्या. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाशी संबंधित अनुदान मागण्यांनाही मंजुरी मिळाली.

<><><><><>

महाराष्ट्राचा २०२५-२६ या वर्षासाठीचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी आज मंजूर केला. विधानसभेत अर्थसंकल्पातल्या अनुदानाच्या विभागवार मागण्यांवर सभागृहात चर्चा झाली आणि त्या मंजूर झाल्या. त्यानंतर अर्थमंत्री अजित पवार यांनी मंजुरीसाठी महाराष्ट्र विनियोजन

विधेयक सादर केलं आणि ते सभागृहानं एकमतानं मंजूर केलं. विधान परिषदेनेही या विधेयकाला मान्यता दिली.

महाराष्ट्र मोटार वाहन सुधारणा विधेयक सदस्यांच्या सूचनांसह विधानसभेत पाठवण्यात आलं. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हे विधेयक विधानपरिषदेत मांडलं. राज्यात लवकरच पार्किंग धोरण आणलं जाईल, स्कूल बस मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दाओसमध्ये झालेल्या करारांमुळे राज्यात १६ लाख रोजगार निर्मिती होणार असून, त्यादृष्टीनं राज्य सरकार या करारांची चोख अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या करारांच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांनी केलेले आरोप त्यांनी फेटाळून लावले.

सरकारच्या घरकुल योजनांतर्गत कोणीही लाभार्थी घरापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वेक्षण करण्याची घोषणा, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केली.

**<><><><><>**

राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी, कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. या समितीत आणखी तज्ज्ञांचा समावेश केला जाईल,

आणि समितीनं दिलेल्या अहवालानुसार विधीमंडळात विधेयक मांडलं जाईल असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईतल्या कॉंक्रीटच्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट असल्याच्या मुद्यावर येत्या सोमवारी बैठक घेण्याचे निर्देश विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. यावेळी नार्वेकर यांनी, त्यांच्या स्वतःच्या मतदारसंघातली कामं रखडल्याचं नमूद करत, खड्डेमुक्त मुंबई या संकल्पनेला गालबोट लागल्याची प्रतिक्रियाही व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचं आश्वासन प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी दिलं.

**<><><><><>**

महारहाष्ट्र विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. चंद्रकांत रघुवंशी, दादाराव केचे, संजय केणेकर, संजय खोडके, संदीप जोशी यांना सभापती राम शिंदे यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या देवगड हापुस आंब्याच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी या वर्षीपासून या आंब्यावर यूनिक आयडी कोड लावण्यात येणार आहे. देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने हा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत एक कोटी स्टिकर्स तयार करण्यात आले असून देवगड तालुक्यातल्या ३०८ शेतकऱ्यांनी ५०

लाखांहून अधिक स्टिकर्स घेतले आहेत. याबाबत आमच्या वार्ताहरानं माहिती दिली....

**व्हॉईस कास्ट - निलेश जोशी....**

**<><><><><>**

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरीत ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना आज होत आहे. भारताची ही अव्वल जोडी हाँगकाँग चायनाच्या युंग गा टिंग आणि युंग पुई लाम या जोडीशी लढेल.

**<><><><><>**

११ व्या आशियाई जलतरण स्पर्धेचे यजमानपद भारताकडे असणार आहे. अहमदाबादमधे नारनपुरा क्रीडा संकुलात १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत पोहणे, डायव्हिंग, आणि वॉटर पोलो यासारख्या विविध जलतरण स्पर्धांचा समावेश असेल.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ५५७ अंकांची वाढ झाली, आणि तो ७६ हजार ९०६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६० अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ३५० अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याचा प्रस्ताव आणि अंतर्गत

चौकशी प्रक्रिया या दोन गोष्टी स्वतंत्र असल्याचं स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयानं निवेदनाद्वारे दिलं आहे. न्यायमूर्ती वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी मोठ्या प्रमाणात बेहिशोबी रोख रक्कम सापडली होती. या प्रकरणाची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय यांनी अंतर्गत चौकशी सुरू केल्याचं आणि या चौकशीचा अहवाल आजच सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासमोर सादर करणार असल्याचंही न्यायालयानं स्पष्ट केलं. त्यानुसार न्यायालय पुढचे निर्णय घेईल.

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचा मुद्दा आज राज्यसभेतही गाजला. काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी शून्य प्रहरात हा मुद्दा उपस्थित केला.

**<><><><><>**

परभणी इथं सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीत झालेल्या मृत्यूला पोलीसच जबाबदार असल्याचं दंडाधिकाऱ्यांच्या चौकशीत समोर आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगानं दिली.

**<><><><><>**

राज्यभरातल्या महसुलाशी संबंधित सुनावण्या डिजिटल स्वरूपात करण्यासाठीच्या प्रत्यय या प्रणालीचा प्रारंभ आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाला. ‘प्रत्यय’, अर्थात पेपरलेस रिव्हिजन अँड

अपील्स इन अ ट्रान्सपरंट वे या प्रणालीमुळे फेरफार, तक्रारी, अपील, पुनर्विलोकन अर्ज इत्यादी विषय ऑनलाईन पद्धतीनं हाताळता येतील.

**//<><><><><>//**